**श्री कृष्णाची आरती १**

ओंवाळूं आरती मदनगोपाळा ।
श्यामसुंदर गळा वैजयंतीमाळा ।। धृ ।।
चरणकमल ज्याचे अति सुकुमार ।
ध्वजवज्राङ्कुश ब्रीदाते तोडर ।। १ ।।
नाभिकमलीं ज्याचें ब्रह्मयाचें स्थान ।
हृदया पदक शोभे श्रीवत्सलांछन ।। २ ।।
मुखकमल पाहातां सूर्याच्याकोटी ।
मोहियेलें मानस कोंदियली दृष्टी ।। ३ ।।
जडितमुगुट ज्याच्या देदीप्यमान ।
तेणें तेजें कोंदलें अवघे त्रिभुवन ।। ४ ।।
एका जनार्दनीं देखियेले रूप ।
रूप पाहों जातां झालेसें तद्रूप ।। ५ ।।